**शासनाकडून जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत झालेल्या कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी, वैद्यकीय देयके, गटविमा योजना, निवृत्ती वेतन इ. देयकांचे प्रदानाबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक- ग्रापापु-१००१/प्र.क्र.३१५/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : १७ जुलै, २००१.**

**परिपत्रक**

राज्य शासनाकडील वायुसंपिडक व सुरुंग योजना, तसेच विंधण विहिर कार्यक्रम महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. हे कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक कर्मचारीवृंदही जिल्हा परिषदांकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेला आहे.

२. जिल्हा परिषदांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभाग / उपविभागामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या वेतन व भत्त्यासाठी तसेच वरील योजनांसोबत जिल्हा परिषदांकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेल्या कर्मचा-यांच्या वेतन व भत्त्यासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते. यासाठी संबंधीत जिल्हा परिषदांच्या मुख्य लेखा व वित्त अधिका-यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. त्यानुसार वेतनाची देयके मुख्य लेखा व वित्त अधिका-यांमार्फत आहरीत करुन त्याचे वितरण करण्यात येते. तथापि योजनांसोबत जिल्हा परिषदांकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेल्या कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी अग्रिम, गट विमा योजना, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व निवृत्ती वेतन देयके इत्यादीच्या प्रदानाबाबत आदेश नसल्यामुळे ती कोषागारातून पारित होण्यास अडचण निर्माण झाली असल्याचे या विभागाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे.



४९३

३.   या संदर्भात सर्व जिल्हा परिषदांना असा खुलासा करण्यात येतो की, योजनांच्या हस्तांतरणासोबत जिल्हा परिषदांकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेल्या कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी अग्रिम, गटविमा योजना, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व निवृत्ती वेतनांची देयके कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, यांनी तयार करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यामार्फत कोषागारात सादर करावीत यासाठी संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,
विभागीय आयुक्त सर्व
सर्व मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद
सदस्य सचिव, (प्रशासन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव, तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र- १ मुंबई (लेखा परिक्षण) (५ प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र- १ मुंबई (लेखा अनुज्ञेयता) (५ प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र- १ नागपूर (लेखा परिक्षण) (५ प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र- १ नागपूर (लेखा अनुज्ञेयता) (५ प्रतीसह)
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७